# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ, मुख्य कार्यालय

जावक क्रं.HO/2024-25/61/281 दि.03/10/2024

## ठेव योजना परिपत्रक

विभागप्रमुख सर्व विभाग, केंद्र कार्यालय व शाखा व्यवस्थापक, सर्व शाखा यांना कळविणेत येते कि, बँकेच्या मा.संचालक मंडळ सभा दि.21/09/2024 ठराव नं.17 नुसार दि.03/10/2024 ते दिनांक 30/04/2025 या कालावधीत सर्व प्रकारच्या ठेवीदारांसाठी (व्यक्तिगत व संस्था ठेवीदार) **विजय उत्सव मुदतबंद ठेव** या योजनेत नव्याने स्वीकारणेत येणाऱ्या ठेवीस खालीलप्रमाणे व्याजदर लागू केलेले आहेत.

**ठेव योजना नांव - व्यक्तिगत विजय उत्सव मुदतबंद ठेव (स्किम कोड नं.333)**

| अ.नं. | कालावधी | सर्वसाधारण व्यक्ती ठेवीदार व्याजदर | जेष्ठ नागरिक/बँक कर्मचारी (सेवेतील/ निवृत्त) ठेवीदार व्याजदर |
|---|---|---|---|
| 1 | 13 महिने | 8.75 % | 9.00 % |

अटी/निकष -

1. सदर ठेव योजनेत किमान रक्कम रु.1,000/- असावी.
2. व्याजाचा परतावा व्यक्तीगत ठेवीदाराचे मागणीनुसार तिमाही/सहामाही/वार्षिक/मुदतीनंतर देणेचे आहे.
3. जेष्ठ नागरिक/बँक कर्मचारी(सेवेतील/निवृत्त)/जेष्ठ निवृत्त बँक कर्मचारी यांचेसाठी 0.25% जादा व्याजदर लागु राहील.
4. मुदतपुर्व ठेवीची रक्कम परत करता येणार नाही. मात्र, काही अपरिहार्य कारणास्तव ठेवीदाराने मागणी केलेस बँकेच्या प्रचलित धोरणानुसार मुदतपुर्व ठेव आदा करणेचे आहे.
5. व्यक्तिगत प्रोप्रायटरी फर्मचे नांवे सुध्दा त्याचे मालकास (प्रोप्रायटर) ठेव ठेवता येईल.
6. ठेवीची मुदत संपलेनंतर ठेव रक्कम संबंधित ठेवीदाराच्या बचत/चालु खात्यात देय व्याजासह जमा केली जाईल.
7. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध राहील. सदर योजनेतील ठेवीच्या तारणावर कर्ज घेतलेस व्याजाची रक्कम ठेवतारण कर्ज खातेस जमा करावी. तसेच ठेवतारण कर्जाची मुदत संपलेनंतर ठेवीच्या रक्कमेचा जमाखर्च केला जाईल. जमाखर्चानंतर रक्कम शिल्लक राहिलेस ती रक्कम बचत / चालु खातेस जमा करावी.

**2) ठेव योजना नांव - विजय उत्सव संस्था मुदतबंद ठेव (स्किम कोड नं.334) (बिगर व्यक्ती)**

| अ.नं. | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| 1 | 13 महिने | 8.75 % |

अटी/निकष -

1. सदर ठेव योजनेत किमान रक्कम रु.100,000/- असावी.
2. व्याजाचा परतावा मागणीनुसार तिमाही/सहामाही/वार्षिक/मुदतीनंतर देणेचे आहे.
3. मुदतपुर्व ठेव परत करणेबाबत संस्थेने रितसर ठरावाद्वारे मागणी केलेस बँकेच्या प्रचलित धोरणानुसार मुदतपुर्व ठेव आदा करावी.
4. ठेवीची मुदत संपलेनंतर ठेव रक्कम संबंधित संस्था ठेवीदाराच्या चालु खात्यात देय व्याजासह जमा केली जाईल.

5. या ठेव योजनेअंतर्गत कोणत्याही सहकारी संस्था/सोसायटी,कंपनी,ट्रस्ट,सामाजिक संस्था व भागिदारी पेढी यांच्या ठेवी स्विकारणेच्या आहेत.

6. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध राहील. सदर योजनेतील ठेवीच्या तारणावर कर्ज घेतलेस व्याजाची रक्कम ठेवतारण कर्ज खातेस जमा केली जाईल. तसेच ठेवतारण कर्जाची मुदत संपलेनंतर ठेवीच्या रक्कमेचा जमाखर्च केला जाईल. जमाखर्चानंतर रक्कम शिल्लक राहिलेस ती रक्कम चालु खातेस जमा करावी.

विशेष सुचना –

- वरील नमुद दोन्ही ठेव योजनेचे व्याजदर दि.03/10/2024 ते दिनांक 30/04/2025 या मर्यादित कालावधीकरिता राहील. तसेच तद्पुर्वी सदर ठेव योजना बंद करणेचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

**3) मा.संचालक मंडळ सभा दि.06/01/2024 ठराव नं.09 नुसार लागु केलेल्या कालनिहाय मुदत व रिकरिंग ठेवीचे व्याजदरामध्ये कोणताही बदल केलेला नाही. ते ठेव व्याजदर खालीलप्रमाणे आहेत.**

A) कालनिहाय मुदत व रिकरिंग ठेवीचे व्याजदर - (व्यक्तीगत व संस्था ठेवीदारांसाठी)

सदर ठेवीचे व्याजदर हे व्यक्तीगत व संस्था या सर्व ठेवीदारासाठी एकच व्याजदर लागु केलेले आहेत.

| अ.नं. | कालावधी | ठेवीचे व्याजदर |
|---|---|---|
| 1 | 7 दिवस ते 30 दिवस पर्यंत | 4.50 % |
| 2 | 31 दिवस ते 60 दिवस पर्यंत | 5.00 % |
| 3 | 61 दिवस ते 90 दिवस पर्यंत | 5.50 % |
| 4 | 91 दिवस ते 180 दिवस पर्यंत | 6.00 % |
| 5 | 181 दिवस ते 1 वर्षपर्यंत | 6.50 % |
| 6 | 1 वर्षाचे पुढे ते 2 वर्षपर्यंत | 7.25 % |
| 7 | 2 वर्षाचे पुढे ते 3 वर्षपर्यंत | 7.50 % |
| 8 | 3 वर्षाचे पुढे | 7.75 % |

टिप –

1. व्याजाचा परतावा ठेवीदाराचे मागणीनुसार मासिक/तिमाही/सहामाही/वार्षिक पध्दतीने देणेचा आहे.

2. रिकरिंग/धनरास ठेवीचा कालावधी कमीत कमी 12 महिने राहील.

3. एक वर्षाचेवरील मुदत ठेवीस जेष्ठ नागरिकांना 0.50 % जादा व्याजदर राहील.

4. सध्या बँकेच्या सेवेत असलेल्या व निवृत्त कर्मचाऱ्यांनी बँकेकडे या कालावधीत गुंतविलेल्या ठेवीवर प्रचलित व्याजदरापेक्षा 1 % जादा व्याजदर देणेचा आहे. तसेच बँकेचे निवृत्त कर्मचारी जेष्ठ नागरिक असलेस त्यांना 0.50 % जादा व्याजदर म्हणजेच प्रचलित व्याजदरापेक्षा 1.50% जादा व्याजदर लागु राहील.

5. सर्व प्रकारच्या मुदत ठेवी,पुनर्गुंतवणुक व रिकरिंग/धनरास ठेवीना सुध्दा सदरचा व्याजदर लागु राहील. तसेच दामदुप्पट ठेव, स्पेशल मुदतबंद ठेव,अमृत ठेव व अमृत रिकरिंग ठेव योजनेसाठी स्वतंत्र निकष व व्याजदर लागु केलेले आहेत.

6. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या शिल्लक रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

B) व्यक्तीगत अमृत रिकरिंग ठेव –

| अ.नं. | मुदत/कालावधी | मासिक ठेव रक्कम | मुदतपुर्तीनंतरची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 18 महिने | 5230 | 100,093 |
| 2 | 24 महिने | 3850 | 100,190 |
| 3 | 36 महिने | 2465 | 100,108 |
| 4 | 60 महिने | 1365 | 100,155 |
| 5 | 84 महिने | 900 | 100,415 |
| 6 | 120 महिने | 555 | 100,497 |

टिप –

1. सदर रिकरिंग ठेव योजनेचा व्याजदर 7.75 % इतका राहिल.
2. सर्वसाधारण व्यक्ती/जेष्ट नागरिक/सेवेतील व माजी बँक कर्मचारी या सर्वासाठी सदरचा व्याजदर लागु राहील.
3. सदर ठेव योजनामध्ये सहकारी संस्था/ट्रस्ट/कंपनी/सार्वजनिक सेवा संस्था/मंडळे यांचे नांवे ठेव स्विकारणेचे नाहीत तथा सर्व प्रकारच्या संस्थाना ही ठेव योजना लागु नाही.
4. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या शिल्लक रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

C) व्यक्तीगत दामदुप्पट ठेव –

| अ.नं. | कालावधी | नवीन व्याजदर | गुंतवणुक रक्कम | कालावधी | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण व्यक्ती | 7.75 % | 100 | 109 महिने | 200 |
| 2 | जेष्ठ नागरिक | 8.25 % | 100 | 102 महिने | 200 |
| 3 | बँक कर्मचारी | 8.75 % | 100 | 96 महिने | 200 |
| 4 | जेष्ठ निवृत्त बँक कर्मचारी | 9.25 % | 100 | 91 महिने | 200 |

टिप –

1. सदर ठेव योजनामध्ये सहकारी संस्था/ट्रस्ट/कंपनी/सार्वजनिक सेवा संस्था/मंडळे यांचे नांवे ठेव स्विकारणेचे नाहीत तथा सर्व प्रकारच्या संस्थाना ही ठेव योजना लागु नाही.
2. सदर ठेव योजनेमध्ये किमान ठेव मर्यादा रु.1000/- इतकी राहील.
3. सदर ठेवीस जेष्ठ नागरिकांना 0.50 % जादा व्याजदर राहील.
4. सध्या बँकेच्या सेवेत असलेल्या व निवृत्त कर्मचाऱ्यांनी बँकेकडे या कालावधीत गुंतविलेल्या ठेवीवर प्रचलित व्याजदरापेक्षा 1 % जादा व्याजदर देणेचा आहे. तसेच बँकेचे निवृत्त कर्मचारी जेष्ठ नागरिक असलेस, त्यांना 0.50 % जादा व्याजदर म्हणजेच प्रचलित व्याजदरापेक्षा 1.50% जादा व्याजदर लागु राहील.
5. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या शिल्लक रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

D) पुनर्गुंतवणुक ठेव –

सदर ठेव प्रकारात नव्याने स्वीकारण्यात येणाऱ्या व नुतनीकरण होणाऱ्या ठेवीना कालनिहाय मुदत ठेवीचा व्याजदर लागु राहील.

टिप –

1. सदर ठेवीस जेष्ठ नागरिकांना 0.50 % जादा व्याजदर राहील.

2. सध्या बँकेच्या सेवेत असलेल्या व निवृत्त कर्मचाऱ्यांनी बँकेकडे या कालावधीत गुंतविलेल्या ठेवीवर प्रचलित व्याजदरापेक्षा 1 % जादा व्याजदर देणेचा आहे. तसेच बँकेचे निवृत्त कर्मचारी जेष्ठ नागरिक असलेस त्यांना 0.50 % जादा व्याजदर म्हणजेच प्रचलित व्याजदरापेक्षा 1.50% जादा व्याजदर लागु राहील.

3. सदर ठेव योजनामध्ये सहकारी संस्था/ट्रस्ट/कंपनी/सार्वजनिक सेवा संस्था/मंडळे यांचे नांवे ठेव स्विकारणेचे नाहीत तथा सर्व प्रकारच्या संस्थाना ही ठेव योजना लागु नाही.

4. बँकेच्या प्रचलित कर्ज धोरणानुसार ठेवीच्या शिल्लक रक्कमेवर ठेवतारण कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

**E) बचत ठेव –**

**व्यक्तिगत बचत ठेव – सदर ठेवीसाठीचे व्याजदर स्वतंत्र परिपत्रकाद्वारे लागु केलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

**संस्था बचत ठेव** – द.सा.द.शे. 3.00 %

दैंनदिन शिल्लक रक्कमेवर व्याज आकारणी करुन दर सहामाहीस खातेवर जमा वर्ग केली जाईल.

**विशेष सुचना –**

- **कोणत्याही प्रकारची मुदत ठेव स्विकारताना व खाते उघडताना (चालु/बचत खाते) रितसर सी-के.वाय.सी /के.वाय.सी कागदपत्राची पुर्तता करुन घेवुनच ठेव खाते उघडणेचे आहे.**
- **खालील नमुद ठेव योजना दि.01/10/2024 पासुन बंद करणेत आलेल्या आहेत याची नोंद घ्यावी.**

| अ.नं. | ठेव प्रकार | स्किम कोड |
|---|---|---|
| 1 | व्यक्तीगत धनलक्ष्मी मुदतबंद ठेव | 330,332,312 |
| 2 | व्यक्तीगत अमृत मुदतबंद ठेव | 329 |
| 3 | व्यक्तीगत स्पेशल मुदतबंद ठेव | 321 |
| 4 | सहकार समृध्दी संस्था मुदतबंद ठेव | 325,331 |
| 5 | सुवर्ण रिकरिंग ठेव | 403 |

Abasaheb Patil Rendal Sahakari Bank Ltd. Rendal.

मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

1) मा.चेअरमन

2) मा.व्हा.चेअरमन

प्रत माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी -

3) विभागप्रमुख-सर्व विभाग,मुख्य कार्यालय

4) शाखा व्यवस्थापक - सर्व शाखा

5) आय.टी सुपरवायझर,मुख्य कार्यालय- संगणकिय प्रणालीमध्ये जरुर त्या ठिकाणी व्याजदर बदलाची नोंद करणेत यावी.

# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ, मुख्य कार्यालय

जावक क्रं.HO/2024-25/61/281 दि.03/10/2024

## ठेव योजना परिपत्रक

विभागप्रमुख सर्व विभाग, केंद्र कार्यालय व शाखा व्यवस्थापक, सर्व शाखा यांना कळविणेत येते कि, बँकेच्या मा.संचालक मंडळ सभा दि.21/09/2024 ठराव नं.13 नुसार दि.01/10/2024 पासुन व्यक्तिगत बचत खात्यात दैनिक शिल्लक रक्कम राखलेस नमुद व्याजदराने दैनिक पध्दतीने व्याज आकारणी करुन दर सहामाहीस व्याजाची रक्कम बचत खात्यात जमावर्ग केली जाईल. विभिन्न व्याजदराचा तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | दैनिक शिल्लक रक्कम | व्याजदर |
|---|---|---|
| 1 | रु.1.00 लाख पर्यत | 3.00 % |
| 2 | रु.1.00 लाख चे वर ते.3.00 लाख पर्यत | 4.00 % |
| 3 | रु.3.00 लाख चे वर ते रु.5.00 लाख पर्यत | 5.00 % |
| 4 | रु.5.00 लाख चे वरील | 5.50 % |

अटी/निकष -

1. सदर बचत ठेव योजना फक्त व्यक्तीगत खातेदारांसाठी लागु राहील.
2. व्याजाची आकारणी दिवसअखेरील शिल्लक असणाऱ्या रक्कमेवर केली जाईल. म्हणजेच शिल्लक रक्कमेवर दैनिक कच्चे (Daily Products) विचारात घेवुन व्याज आकारणी होईल.
3. व्याजाची रक्कम वर्षातुन दोनवेळा म्हणजेच 30 सप्टेंबर व 31 मार्च रोजी बचत खात्यात जमावर्ग केली जाईल.
4. सदरचे बचत खाते उघडताना रितसर सी-के.वाय.सी/के.वाय.सी कागदपत्राची पुर्तता करुन घेवुनच खाते उघडणेचे आहे.
5. या योजनेत बँकेच्या प्रचलित ठेव धोरणानुसार सर्व प्रकारच्या सुविधा खातेदारास उपलब्ध राहतील.
6. सदर बचत खातेवरील मिळालेले व्याज करमुक्त असणार आहे. मिळालेल्या व्याजावर कोणताही टी.डी.एस कपात होणार नाही.
7. सदर ठेव योजना बंद करणेचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

Abasaheb Patil Rendal Sahakari Bank Ltd. Rendal.

मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

1) मा.चेअरमन
2) मा.व्हा.चेअरमन

प्रत माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी -

3) विभागप्रमुख-सर्व विभाग,मुख्य कार्यालय
4) शाखा व्यवस्थापक - सर्व शाखा
5) आय.टी सुपरवायझर,मुख्य कार्यालय- संगणकिय प्रणालीमध्ये जरुर त्या ठिकाणी व्याजदर बदलाची नोंद करणेत यावी.